# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाजेनको, कोराडी द्वारा नविन प्रस्तावित 2 X 660 MW विद्युत
**{ सा.आ.अ. विभाग }** निर्मिती प्रकल्पाकरीता नाग नदी व पिवळी नदी च्या डाऊन स्ट्रीम भागातील संगमानंतर सांडपाण्याची उचल करुन त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत.

मुख्य अभियंता, स्थापत्य – II, महाजेनको, कोराडी यांनी दिनांक 30.08.2024 चे पत्रान्वये नविन प्रस्तावित 2 X 660 MW विद्युत निर्मिती प्रकल्पाकरीता नाग नदी व पिवळी नदी च्या डाऊन स्ट्रीम भागातील संगमानंतर सांडपाण्याचा उचला करुन त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत विनंती केली. त्याअनुषंगाने प्रस्तावावर विस्तृत चर्चा करण्याकरीता मा. आयुक्त, मनपा यांचे कार्यालयात मनपाचे अधिकारी, महाजेनकोचे अधिकारी यांची संयुक्त बैठक दिनांक 12.09.2024 रोजी संपन्न झाली.

नागपूर शहरातील नाग नदी व पिवळी नदी वरील अस्तित्वातील सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची क्षमता लक्षात घेता नागपूर शहराबाहेर दोन्ही नद्यांच्या संगमानंतर उर्वरीत सांडपाण्यामधून 135 $\pm$ 10% द.ल.लि. प्रति दिन महाजेनकोद्वारे उचल करण्याचा प्रस्ताव आहे. त्यांचेद्वारे नविन सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे बांधकाम करणे, सांडपाण्यावर दुय्यम प्रक्रिया करणे (Secondary Treatment) आणि तद्नंतर त्यावर महाजेनकोच्या कोराडी येथील जागेमध्ये Tertiary Treatment Plant उभारुन व प्रक्रिया करुन नविन प्रस्तावित कोराडी औष्णिक विद्युत केंद्र 2 X 660 MW चे Cooling Tower करीता पुर्नवापर करण्यात येणार आहे. यामुळे नदीतील प्रदूषण बऱ्याच अंशी कमी होण्यास मदत होईल व स्वच्छ पाण्याची सुध्दा बचत होईल.

नाग नदी व पिवळी नदी यांचे संगम पाईंट नंतर उभारण्यात येणारे पंपिंग स्टेशन, ट्रान्समिशन पाईपलाईन, सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता लागणारा भांडवली खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च महाजेनकोद्वारे करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांचेद्वारा नागपूर महानगरपालिकेस कुठलीही रॉयल्टी प्राप्त होणार नाही. तसेच नागपूर महानगरपालिकेद्वारे महाजेनकोस सांडपाण्याची उपलब्धता व गुणवत्ता बाबत कुठलेही आश्वासन देण्यात आलेले नाही. त्यामुळे सांमजस्य करारामध्ये पेनाल्टी क्लॉजचा समावेश करण्यात आलेला नाही. महाजेनकोद्वारे प्रस्तावित सांडपाणी पुर्नवापर प्रकल्पाकरीता लागणाऱ्या सर्व परवानग्या घेण्याची जबाबदारी महाजेनकोची असेल.

नाग नदी व पिवळी नदी यांचे संगम पाईंट नंतर उभारण्यात येणारे पंपिंग स्टेशन करीता लागणारी जागा मनपा हद्दीत व स्वमालकीची असल्यास ती मनपाचे स्थावर विभागाचे प्रचलित नियमानुसार महाजेनकोस लिजवर उपलब्ध करुन देण्यात येईल किंवा महाजेनकोद्वारे स्वत: स्वखर्चाने अन्य जागा उपलब्ध करुन घ्यावी लागेल. मनपाचे कार्यक्षेत्रात लागणाऱ्या परवानग्या, मंजूरी, राईट ऑफ वे करीता मनपा महाजेनकोस सहकार्य करेल. तसेच याकरीता लागणारा कुठलाही खर्च मनपा वहन करणार नाही.

नागपूर महानगरपालिका व महाजेनको यांचे दरम्यान सांमजस्य करार करण्याबाबत दोन्ही संस्थांद्वारे कायदयाचे सल्लागारांमार्फत तपासणी करण्यात येवून सांमजस्य कराराचे प्रारुप अंतिम करण्यात आलेले आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे कायदयाचे सल्लागाराकडून दिनांक 11.10.2024 आणि 03.02.2025 ला प्रारुप सांमजस्य कराराची कायदेशीर तपासणी करण्यात आलेली आहे.

करीता, उपरोक्तप्रमाणे महाजेनको, कोराडी द्वारा नविन प्रस्तावित 2 X 660 MW विद्युत निर्मिती प्रकल्पाकरीता नाग नदी व पिवळी नदी च्या डाऊन स्ट्रीम भागातील संगमानंतर सांडपाण्याची उचल करुन त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिपः-

1. सविस्तर माहिती नस्तीमधे उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 137/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 06/03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रीकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाजेनको, कोराडी द्वारा नविन प्रस्तावित 2 X 660 MW विद्युत निर्मिती प्रकल्पाकरीता नाग नदी व पिवळी नदी च्या डाऊन स्ट्रीम भागातील संगमानंतर सांडपाण्याची उचल करुन त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत.

मुख्य अभियंता, स्थापत्य – II, महाजेनको, कोराडी यांनी दिनांक 30.08.2024 चे पत्रान्वये नविन प्रस्तावित 2 X 660 MW विद्युत निर्मिती प्रकल्पाकरीता नाग नदी व पिवळी नदी च्या डाऊन स्ट्रीम भागातील संगमानंतर सांडपाण्याचा उचला करुन त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत विनंती केली. त्याअनुषंगाने प्रस्तावावर विस्तृत चर्चा करण्याकरीता मा. आयुक्त, मनपा यांचे कार्यालयात मनपाचे अधिकारी, महाजेनकोचे अधिकारी यांची संयुक्त बैठक दिनांक 12.09.2024 रोजी संपन्न झाली.

नागपूर शहरातील नाग नदी व पिवळी नदी वरील अस्तित्वातील सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची क्षमता लक्षात घेता नागपूर शहराबाहेर दोन्ही नद्यांच्या संगमानंतर उर्वरीत सांडपाण्यामधून 135 ± 10% द.ल.लि. प्रति दिन महाजेनकोद्वारे उचल करण्याचा प्रस्ताव आहे. त्यांचेद्वारे नविन सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे बांधकाम करणे, सांडपाण्यावर दुय्यम प्रक्रिया करणे (Secondary Treatment) आणि तद्नंतर त्यावर महाजेनकोच्या कोराडी येथील जागेमध्ये Tertiary Treatment Plant उभारुन व प्रक्रिया करुन नविन प्रस्तावित कोराडी औष्णिक विद्युत केंद्र 2 X 660 MW चे Cooling Tower करीता पुर्नवापर करण्यात येणार आहे. यामुळे नदीतील प्रदूषण बऱ्याच अंशी कमी होण्यास मदत होईल व स्वच्छ पाण्याची सुध्दा बचत होईल.

नाग नदी व पिवळी नदी यांचे संगम पाईंट नंतर उभारण्यात येणारे पंपिंग स्टेशन, ट्रान्समिशन पाईपलाईन, सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता लागणारा भांडवली खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च महाजेनकोद्वारे करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांचेद्वारा नागपूर महानगरपालिकेस कुठलीही रॉयल्टी प्राप्त होणार नाही. तसेच नागपूर महानगरपालिकेद्वारे महाजेनकोस सांडपाण्याची उपलब्धता व गुणवत्ता बाबत कुठलेही आश्वासन देण्यात आलेले नाही. त्यामुळे सांमजस्य करारामध्ये पेनाल्टी क्लॉजचा समावेश करण्यात

आलेला नाही. महाजेनकोद्वारे प्रस्तावित सांडपाणी पुर्नवापर प्रकल्पाकरीता लागणाऱ्या सर्व परवानग्या घेण्याची जबाबदारी महाजेनकोची असेल.

नाग नदी व पिवळी नदी यांचे संगम पाईंट नंतर उभारण्यात येणारे पंपिंग स्टेशन करीता लागणारी जागा मनपा हद्दीत व स्वमालकीची असल्यास ती मनपाचे स्थावर विभागाचे प्रचलित नियमानुसार महाजेनकोस लिजवर उपलब्ध करुन देण्यात येईल किंवा महाजेनकोद्वारे स्वत: स्वखर्चाने अन्य जागा उपलब्ध करुन घ्यावी लागेल. मनपाचे कार्यक्षेत्रात लागणाऱ्या परवानग्या, मंजूरी, राईट ऑफ वे करीता मनपा महाजेनकोस सहकार्य करेल. तसेच याकरीता लागणारा कुठलाही खर्च मनपा वहन करणार नाही.

नागपूर महानगरपालिका व महाजेनको यांचे दरम्यान सांमजस्य करार करण्याबाबत दोन्ही संस्थांद्वारे कायदयाचे सल्लागारांमार्फत तपासणी करण्यात येवून सांमजस्य कराराचे प्रारुप अंतिम करण्यात आलेले आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे कायदयाचे सल्लागाराकडून दिनांक 11.10.2024 आणि 03.02.2025 ला प्रारुप सांमजस्य कराराची कायदेशीर तपासणी करण्यात आलेली आहे.

करीता, उपरोक्तप्रमाणे महाजेनको, कोराडी द्वारा नविन प्रस्तावित 2 X 660 MW विद्युत निर्मिती प्रकल्पाकरीता नाग नदी व पिवळी नदी च्या डाऊन स्ट्रीम भागातील संगमानंतर सांडपाण्याची उचल करुन त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.